नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

। अंक ३१९ । वर्ष ४८ वे । सोमवार, ११ डिसेंबर २०२३ । पाने १२

# कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ थांबला पाहिजे- डॉ.शेळके

पुणतांबा (वार्ताहर)- कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळाच्या प्रसंगांना शहरी आणि ग्रामीण भागातील महिला मोठ्या प्रमाणावर सहन करत असतात. आपली बदनामी होईल, कुटुंबात आपले म्हणणे कोणी ऐकून घेणार नाही. आपल्यालाच दोष देतील अशी द्विधा मनस्थिती महिलांची असते. तरीही त्याविरोधातली कायद्याची अंमलबजावणी अद्याप प्रभावीपणे केली जात नाही. ग्रामीण खेड्यात महिलांवर होणारे अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे. हे थांबविण्यासाठी समाजाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन आशा केंद्राचे कार्यकारी विश्वस्त डॉ. सुरेश शेळके यांनी केले

महाराष्ट्र शासनाने कामाच्या ठिकानी महिलांना सुरक्षा असावी म्हणून १० वर्षांपूर्वी हा कायदा केला. कायद्याला दहा वर्षे पूर्ण झाली त्यानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात डॉ.सुरेश शेळके बोलत होते. ते म्हणाले आशा केंद्राच्या माध्यमातून ग्रामीण भागात आरोग्य व महिलांच्या प्रश्नांवर काम करताना अनेक प्रसंग महिलांच्या सुरक्षेसंदर्भात उद्भवत आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ अधिनियम २०१३ कायदा करण्यात आला. या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी कशी होईल यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.पुरुष म्हणून काम करत असताना या कायद्याबद्दल आणि एकंदरितच लिंग समभाव रुजविण्यासाठी मुले, युवक आणि पुरुषांसोबत मोठ्या प्रमाणावर काम करणे ही काळाची गरज आहे. अनेक ठिकाणी अशा समित्याच तयार झाल्या नाहीत ज्या ठिकाणी अशा समित्या आहेत त्या केवळ कागदावरच आहेत. समिती सदस्यांचे बोर्ड कोठेतरी संस्थाचालकांच्या केबिनमध्ये लावलें आहेत. ग्रामीण भागात काम करत असताना लोकांना शिक्षित करणे, कायद्याचे ज्ञान देणे, लिंग समभाव रुजविणे, ज्या समित्या आहेत त्यांचे कामकाज नीट होते का हे पाहणे. पीडित महिलेला न्याय मिळेल, कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळेल याची जबाबदारी आपल्या सर्वांवर आहे, असें डॉ. शेळके यांनी स्पष्ट केले.